**नि.फौ.ख.क्र. २८४/२०२२**

**सरकार –वि– नानासाहेब आहेर**

**निशाणी क्र. १८**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची शपथेवर जबानी.**

नांव – योगेश बाळू आहेर

वय – २६

धंदा – शेती

राहणार – भुत्याणे, ता. चांदवड, जि. नाशिक

**सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता**

१. दि.२७.०५.२०२२ रोजी सकाळी १० वाजता मी माझा मावस भाऊ शंकर अंबादास जाधव याची मोटारसायकल घेऊन आमच्या गावातील रोहिदास महाले यांच्या घरभरणीच्या कार्यक्रमासाठी गेलो होतो. तो कार्यक्रम आटोपून मी दुपारी २ वाजता गावातील अंबादास आहेर यांच्या किराणा दुकानात गेलो होतो. तिथे आरोपी होता. त्याने मला बघून म्हटले की, तु कोनाच्या पोटचा आहे, तु आमच्या फुकटच्या जमिनीवर कशाला आला आहेस अशी शिवीगाळ केली. त्याबाबत मी आरोपीला उत्तर दिले व दुकानातून शांपूची पूडी घेऊन घरी निघालो. माझ्या घराच्या पाठीमागे असलेल्या लेंडी नदीजवळ मी माझ्या फोनवर बोलत असतांना पाठीमागून तिथे आरोपी त्याच्या मोटारसायकलवरुन आला व त्याने त्याच्या हातातील कोयत्याने माझ्या डाव्या हातावर वार केला. माझ्या हातातील मोबाईल खाली पडला होता तो उचलण्यासाठी मी खाली वाकलो असता आरोपीने माझ्या उजव्या हातावर कोयत्याने मारले. त्यामुळे मी माझ्या घराकडे धावत

गेलो. तेव्हा तुषार महाले हा ट्रॅक्टरला डिझेल घेण्यासाठी चालला होता. मी त्याला सांगितले की, आरोपीने मला कोयत्याने मारुन जखमी केले आहे. मला सरकारी दवाखान्यात घेऊन चल. तुषार महालेच्या दुचाकीवर बसून मी वडाळी भोई सरकारी दवाखान्यात गेलो.

२. वडाळी भोई सरकारी दवाखान्यात पोलीस आले व त्यांनी मला उपचारासाठी चांदवड सरकारी दवाखान्यात नेले. त्यानंतर माझी आई आली व तिने आरोपीविरुद्ध पो.स्टेशनला फिर्याद दिली. आरोपीने ज्या कोयत्याने मला मारहाण केली होती. तो कोयता मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. मला आता दाखविलेला कोयता तोच आहे. त्याला **आर्टीकल ए** देण्यात येते. आरोपीविरुद्ध दिलेली फिर्याद दाखविल्यास मी ओळखू शकतो. मला आता दाखवलेली फिर्याद मी दिलेली असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्याला **निशाणी १९** देण्यात येते. मला आता छापील प्रथमखबर दाखवण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. मी दवाखान्यात असल्यामुळे त्याच्यावर माझी सही नाही. त्याला **आर्टीकल बी** देण्यात येते. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. पी. के. पाटील यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

३. मी भुत्याणे आणि मालसाणे रोडच्या शिवेवर राहतो. हे म्हणणे खरे आहे की माझे शेत ते गाव हे साधारणतः एक ते दिड किमीचे अंतर आहे. मला सूर्यभान, चंद्रभान, नाना आहेर असे तीन काका आहेत आणि निर्मला कदम व सुनिता कांडेकर अशा दोन आत्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की

मी न्यायालयामध्ये नेहमी माझ्या आईसोबत येतो. हे म्हणणे खरे नाही की माझ्या आई वडीलांचे त्यांच्या लग्नापासून वाद चालू आहेत. हे म्हणणे खरे आहे की माझ्या जन्मानंतर माझ्या आईवडीलांमध्ये वाद चालू झाले. माझ्या आईवडीलांमध्ये कशावरुन वाद चालू होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की मी माझ्या वडीलांचा मुलगा नाही अशी तक्रार माझ्या वडीलांनी पो.स्टेशनला, न्यायालयामध्ये व कुटूंबामध्ये केली होती त्यावरुन माझ्या आईवडीलांमध्ये वाद होता.

४. हे म्हणणे खरे आहे की मी आरोपीविरुद्ध तसेच माझ्या वडीलांविरुद्ध व इतर चुलत्यांविरुद्ध न्यायालयामध्ये वाटपाचा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या आईने न्यायालयामध्ये माझ्या वडीलांविरुद्ध खावटी मिळण्यासाठी दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की शंकर अंबादास जाधव हा माझा मावस भाऊ आहे. तसेच दिपक त्र्यंबक गडोजे, अमोल अशोक जाधव, राजेंद्र अनिल जाधव हे माझे मावस भाऊ आहेत. हे म्हणणे खरे नाही की तुषार महाले हा माझा मित्र आहे.

५. आमच्या गावची लोकसंख्या अडीच हजार आहे. गावापासून माझ्या शेताकडे येण्याच्या रस्त्यावर रामदास आहेर, जगन शिंदे, साहेबराव पवार, दामू आहेर यांची घरे आहेत. गावापासून माझ्या शेताकडे येण्याच्या रस्त्यावर साधारणतः ३० ते ४० लोकांची घरे आहेत. आरोपीने मला मारहाण केल्यानंतर मी ओरडलो नाही व तिथे कोणीही लोक जमा झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की गावाकडून माझ्या शेताकडे जाणारा रस्ता खडबडीत, दगडगोट्यांचा आहे. साक्षीदार पुन्हा सांगतो की तो रस्ता चांगला आहे. मात्र रस्त्यावर काही ठिकाणी खड्डे पडलेले आहेत.

६. आरोपी त्याच्या जन्मापासून अपंग आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. आरोपीचा अपघात झाला होता. त्या अपघातामध्ये आरोपीच्या पायाला मार लागल्यामुळे आरोपी लंगडत चालतो किंवा कसे ते मला सांगता येणार नाही. आरोपीचा अपघात कधी झाला होता ते मला सांगता येणार नाही.

७. आरोपीच्या मुलाने माझ्याविरुद्ध व सदर प्रकरणातील साक्षीदाराविरुद्ध एन.सी. क्र. २३५/२०१९ वडनेर भैरव पो.स्टेशनला दिली होती किंवा हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की शेतीच्या वाटपावरुन मी आरोपीच्या मुलाला धमकी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की माझी आत्या निर्मला कदमने माझ्याविरुद्ध मी शिवीगाळ करतो व शेतीच्या वाटपावरुन वाद निर्माण करतो यासाठी वडाळी भोई पोलीस ठाण्यात दि.१६.०२.२०१९ रोजी फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की माधूरी प्रकाश आहेरने मी ती छेड काढतो, दारु पिऊन शिवीगाळ करतो म्हणून माझ्याविरुद्ध दि.१९.०७.२०१९ रोजी पो.स्टेशनला फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे नाही की त्यामध्ये मला चौकशीसाठी पो.स्टेशनला बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की माझे चुलते सूर्यभान आहेरने माझ्याविरुद्ध दि.१६.०६.२०२१ रोजी पो.स्टेशनला फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे नाही की माझी आत्या निर्मला कदम व सुनिता कांडेकर यांनी माझ्याविरुद्ध त्यांनी गट नं. ६२५ व गट नं. ६८९ मध्ये केलेले पिक मी चोरुन कापून नेले अशी फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की माझ्या आत्याने न्यायालयामध्ये वाटपाचा दावा दाखल केलेला होता त्यामध्ये मनाई हुकूम असतांनाही मी शेतातील पिके कापून चोरुन नेल्याबाबत तिने माझ्याविरुद्ध न्यायालयामध्ये अर्ज दिलेला

होता.

८. माझ्यामध्ये, माझ्या आत्यामध्ये व चुलत्यांमध्ये गट नं. ६८९, गट नं. ६२५, गट नं. २१३, गट नं. २१४, गट नं. २१६ वरुन वाद आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी व माझा मावस भाऊ शंकर जाधवने रात्री ११ वाजता आरोपीच्या घरी येऊन त्याला शिवीगाळ केल्याबाबत आमच्याविरुद्ध पो.स्टेशनला तक्रार दाखल आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपी गावी येऊन शेती करत नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपी गावी वर्षातून दोन ते तीन वेळा येतात नेहमी येत नाही.

९. मी आज न्यायालयामध्ये माझा मावस भाऊ शंकर जाधवसोबत आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की न्यायालयामध्ये येतांना कशी साक्ष द्यायची याबाबत आमच्या दोघांमध्ये बरीच चर्चा झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की कोयत्याचा वापर शेतकरी जनावरांसाठी चारा, गवत कापण्यासाठी करतात. प्रत्येक शेतकऱ्याच्या घरी आर्टीकल ए कडे असणाऱ्या कोयत्यासारखे कोयते असतात किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. आर्टीकल ए कडे जो कोयता आहे तसे कोयते प्रत्येक हार्डवेअरच्या दुकानात मिळतात किंवा कसे ते मला सांगता येणार नाही.

**आरोपीच्या वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.11.03 15:18:36 +0530

**दि. ०३.११.२०२५**

**(वृषाली दी. सुंगारे)**

**सह दिवाणी न्यायदंडाधिकारी,**

**क.स्तर चांदवड.**